“मराठा जातीतील विधवा महिलांच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास.”
(विशेष संदर्भ: परभणी जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मानवविज्ञान विद्याशाखा अंतर्गत समाजशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती
(पीएच.डी) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा आराखडा.

प्रारुप आराखडा
(Synopsis)

संशोधक
सुचिता सुभाषराव ढोणे

मार्गदर्शक
प्रा. डॉ. फिसफिसे टी. आर.
एम.ए. नेट, पीएच.डी.
सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख
समाजशास्त्र विभाग
श्री. शिवाजी महाविद्यालय, परभणी

संशोधन केंद्र
सामाजिकशास्त्र संकूल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड.

प्रस्तावना: (Introduction)

1.1 जातीची पार्श्वभूमी -

भारतीय जाती व्यवस्था ही भारतीय समाजाची पायाभूत व्यवस्था आहे. प्राचीन भारतात ह्या व्यवस्थेचा विकास झाला आणि ती पुढे मध्ययुगीन काळात, आधुनिक पूर्व काळात आणि आधुनिक काळात बदलत गेली असे मानले जाते. ह्या व्यवस्थेतील मोठी संरचनात्मक स्थित्यंतरे मुघल साम्राज्याच्या काळात आणि ब्रिटिश साम्राज्याच्या काळात झाली आहेत असे मानले जाते. ह्या व्यवस्थेला मात देण्यासाठी आजच्या भारतीय समाजामध्ये राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक पातळ्यांवर आरक्षणाची व्यवस्था निर्माण करण्यात आली. जाती व्यवस्था दोन भिन्न संकल्पनां पासून बनलेली आहे, वर्ण व्यवस्था आणि जाती व्यवस्था वास्तविक पहाता ह्या सामाजिक स्तरीकरणाच्या विश्लेषणासाठी वापरण्यात येणाऱ्या दोन वेगवेगळ्या पद्धती आहेत.
सध्या अस्तित्वात असलेली जाती व्यवस्था ही मुगल काळाच्या अंताकडे आणि ब्रिटिश काळाच्या सुरुवातीला भारतीय समाजामध्ये झालेल्या अनेक स्थित्यंतरातून निर्माण झालेली आहे. मुघल साम्राज्याच्या अंताच्या काळामध्ये अनेक शक्तिशाली व्यक्तीचा आणि गटांचा उदय झाला. त्यांनी स्वतः राजेशाही, धर्ममार्तंड आणि ब्राह्मण यांच्या बरोबरीने उभे राहाण्याची ताकद कमावली होती, ह्या सामाजिक बदलामुळे अनेक जातिबाह्य गटांमध्ये ही जातीय अस्मितांची निर्मिती व्हायला मदत झाली. ब्रिटिश काळात ह्याच सामाजिक स्थित्यंतराचे ब्रिटिशांनी आणलेल्या प्रशासकीय व्यवस्थेमध्ये स्थिर अश्या जाती घडविण्यामध्ये रूपांतरण झाले. १८६० आणि १९२० दरम्यान, ब्रिटीशांनी भारतीय समाजाला जातीय स्तरावर वेगवेगळे मांडायला सुरुवात केली होती, त्यातूनच प्रशासकीय पदे आणि कामे ही फक्त उच्च जातीय लोकांनाच देण्याचा पायंडा त्यांनी पाडला. ज्याचा परिणाम स्वरूप १९२० साली मोठ्या प्रमाणात समाजातून विरोध निर्माण झाला आणि ब्रिटीशांना त्यांच्या ह्या धोरणामध्ये बदल करावा लागला. आणि त्यापुढे ब्रिटीशांनी सरकारी नोकऱ्यांच्या काही पदांवर आणि एकूण पदातील काही टक्के पदांवर खालच्या जातीच्या लोकांनाही घ्यायला सुरुवात केली आणि आरक्षणाची सुरुवात केली.

भारतीय जाती व्यवस्थेमध्ये भारतात अनेक जाती आहेत त्यापैकी मराठा ही एक जात आहे. त्यामध्ये विधवा महिलांची स्थिती अतिशय दयनीय आहे. त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यांना समाजामध्ये दुय्यम दर्जा आहे, कनिष्ठ स्थान आहे, शैक्षणिक दर्जा पण निष्कृष्ट आहे हा भारतीय समाजाचा महत्त्वाचा घटक आहेत आणि यांचा विकास होणे त्यांना चांगले जीवन जगता येणे आवश्यक आहे त्याशिवाय समानता समाजात येणार नाही आणि भारताचा पूर्ण विकास झाला भारत देश विकसनशील राष्ट्र राहील भारत देशाला विकसित राष्ट्र होण्यासाठी

विधवा महिलांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही म्हणून प्रस्तुत संशोधन करण्यात येत आहे.

1.2 मराठा जातीची पार्श्वभूमी -

मराठा **जात** (कुणबी), मेंढपाळ (धनगर), खेडूत (गवळी), लोहार (लोहार), सुतार (सुतार) या कुटुंबांच्या एकत्रीकरणातून निर्माण झालेल्या 96 मराठी कुळांपासून बनलेली आहे. महाराष्ट्रात भंडारी, ठाकर आणि कोळी जाती आहेत. त्यापैकी अनेकांनी १६ व्या शतकात दख्खन सल्तनत किंवा मुघलांसाठी लष्करी सेवा स्वीकारली. नंतर 17 व्या आणि 18 व्या शतकात, त्यांनी मराठा साम्राज्याच्या सैन्यात सेवा केली, ज्याची स्थापना छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठा कुणबी जातीने केली. बऱ्याच मराठ्यांना त्यांच्या सेवेसाठी सुलतानांनी आणि मुघलांनी वंशपरंपरागत जामीर दिले होते. महाराष्ट्रीय इतिहासकार बी.आर. सुंथनकर आणि राजेंद्र व्होरा यांसारख्या विद्वानांच्या मते, "मराठा" ही एक "मध्यम-शेतकरी" जात आहे जिने इतर कुणबी शेतकरी जातींसह महाराष्ट्रीय समाजाचा मोठा भाग बनवला. व्होरा पुढे म्हणाले की राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे 30 टक्के मराठ्यांचा वाटा आहे आणि त्यांच्या संख्यात्मक ताकदीमुळे, विशेषतः ग्रामीण समाजात महाराष्ट्रातील सत्ता रचनेवर वर्चस्व आहे . एक्सेटर विद्यापीठातील ब्रिटिश इतिहासकार जेरेमी ब्लॅक यांच्या मते, "17 व्या आणि 18 व्या शतकात लष्करात काम केल्यामुळे मराठा जात ही शेतकरी, मेंढपाळ, लोखंडी कामगार इत्यादींचा एकत्रित समूह आहे". त्या ग्रामीण भागातील प्रबळ जाती आहेत आणि प्रामुख्याने जमीनदार शेतकरी आहेत. 2018 पर्यंत, मराठा जातीतील 80% सदस्य शेतकरी होते. मराठ्यांची 96 वेगवेगळ्या कुळांमध्ये विभागणी करण्यात आली आहे, ज्यांना *96* कुली मराठा किंवा शहान्नाऊ म्हणून ओळखले जाते. तीन कुळ याद्या अस्तित्वात आहेत, परंतु याद्यांचा सामान्य भाग सहसा एकमेकांशी खूप भिन्न असतो. या याद्या 19 व्या शतकात संकलित केल्या गेल्या. १९५० च्या दशकापासून मराठा आणि कुणबी यांच्यात फारसा सामाजिक भेद नाही. मराठा राजा छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठा साम्राज्याची स्थापना केली ज्यामध्ये मराठा आणि महाराष्ट्रातील इतर अनेक जातींमधील योद्धे आणि इतर थोर लोकांचा समावेश होता. 18 व्या शतकात हे साम्राज्य भारतात प्रबळ होते.

मानव जातीमध्ये पुरुष व स्त्री असे दोन सजीव आहेत. परंतु समाजामध्ये स्त्री व पुरुष यांना समानतेची वागणूक दिली जात नाही. लिंग भेदभाव करून स्त्रियांना कनिष्ठ व पुरुषांना श्रेष्ठ समजले जाते. कोणताही धर्म जाती वंश यामध्ये लिंगभेदानुसार स्त्रियांना निम्न स्थान आहे. त्यामुळे स्त्रियांबाबत अनेक समस्या निर्माण झाल्या व होतआहेत. भारत देशामध्ये अनेक जाती धर्माचे लोक राहतात आणि

प्रत्येक धर्मात जातीत विधवा स्त्रियांची अवस्था दयनीय आहे. महाराष्ट्र राज्याने भारत देशात अनेक सामाजिक व राजकीय उत्कृष्ट कार्य करण्यात मानाचे स्थान मिळवले असले तरी विधवा स्त्रियांच्या समस्या महाराष्ट्र राज्यात प्रकर्षाने आढळतात.

परभणी जिल्ह्यामध्ये स्त्रियांच्या समस्या प्रचंड प्रमाणात आहेत. त्यामध्ये विधवा स्त्रियांची अवस्था एखाद्या पाळीव प्राण्याप्रमाणे आहे. ज्यांना स्वतःचे मत मांडण्याचा सुद्धा अधिकार नाही. परभणी शहराचे जुने नाव प्रभावती नगर असे होते व परभणी जिल्ह्याचे क्षेत्रफळ 6512 चौरस किमी आहे परभणीच्या पूर्वेस नांदेड पश्चिमेस बीड व जालना असे जिल्हे स्थित आहेत.

1.3 विधवात्वाचा इतिहास. -

विधवात्व म्हणजे त्याग, एकाकीपणा आणि एकांताचे जीवन. ही आर्थिक स्थिती आहे आणि सामाजिक वंचितता. विधवापणाच्या प्रथेचा उगम सैद्धांतिकदृष्ट्या अज्ञात आहे. ब्राह्मणवादी पितृसत्ता मध्ये मूळ असू शकते ज्याने भारतीय समाजव्यवस्थेची व्याख्या केली आहे. उपखंड मनुस्मृतीने या संदर्भात विवेचनात्मक मजकूर तयार केला आहेहिंदू विधवेसाठीच्या प्रिस्क्रिप्शनचे वर्णन करते. चक्रवर्ती उद्धृत करण्यासाठी:

"तिने मरेपर्यंत दीर्घकाळ दु:ख सहन केले पाहिजे, आत्मसंयमी आणि शुद्ध, एक पती असलेल्या स्त्रियांचे अतुलनीय कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रयत्नशील असावे."

मनुस्मृतीसह इतर धर्मशास्त्रे ज्यातून उगम पावतात विधवांसाठी विहित नियम निर्माण झाले आहेत. हे कोणते मार्ग होते हे स्पष्ट नाही हे विधवा आणि त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचवले गेले आणि हे प्रिस्क्रिप्शन किती प्रमाणात होते. त्यांच्या नंतर. शिवाय प्राचीन काळातील स्त्रियांना हे ज्ञान नसत हे आदेश स्वीकारले ज्याने त्यांच्या पदाचा अवमान केला आणि त्यांच्यासाठी अडचणी निर्माण केल्या, कोणताही प्रतिकार न करता. भारतीय समाज सखोल होता हेच गृहीत धरू शकतो हिंदू धर्मात अडकलेल्या, हे नियम देव पुरुषांद्वारे कळवले गेले . पवित्र ग्रंथांचे दुभाषी मानले जाते आणि स्त्रियांना संस्थेत सामील करण्यात आले होते. तपस्वी विधवात्व त्यांच्यासमोर पवित्र स्त्रीत्वाचा आदर्श म्हणून सादर सादरकेले जात आहे आणि पतीच्या मृत्यूनंतर सामाजिक स्वीकाराची गुरुकिल्ली.

1.4 विधवा अर्थ व स्वरूप. -

महिलांच्या आयुष्यात त्यांचा पती निधन होणे म्हणजे फार दुःखाची घटना असते. अशा स्त्रीला आधार देऊ संवेदनशील दृष्टीने न पाहता समाज तिच्याकडे तुच्छ नजरेने पाहतो. जोपर्यंत पती जिवंत असतो तोपर्यंत तिला समाजात प्रतिष्ठा मानसन्मान मिळतो. परंतु जेव्हा पतीचे निधन होते तेव्हा तिला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते जसे काही पापस केल्यासारखे वर्तन काही समाजातील लोक या महिलेसोबत करतात विधवा महिलांच्या अशा अनेक समस्यांचा अभ्यास करण्यापूर्वी विधवा म्हणजे काय? हे जाणून घेणे आवश्यक आहे. विधवा या शब्दाची फोड केल्यास लक्षात येते की व्ही म्हणजे अभाव किंवा वंचित असणे आणि दवा म्हणजे किंवा पुरुष नवरा नसणे/ मृत पावणे. एकंदरीत सर्वपरिषद असल्याप्रमाणे ज्या महिलेचा पती मृत झाला अशी महिला म्हणजे विधवा. समाजामध्ये विधवा या शब्दासोबतच या महिलांना काही इतर नावे देखील आहेत. प्राचीन काळी कमी वयात विवाह आणि त्यात मातृत्वाचा भार आणि कमी वयात विधवा होणे. बऱ्याच महिला नवरा म्हणजे काय हे माहित होण्याच्या आतच विधवा होत. अशा या बालिकांना संपूर्ण आयुष्य विधवा म्हणूनच जगावे लागत परंतु पुरुषांना मात्र पुनर्विवाह करण्याची विवाह होती. विधवांच्या अवस्थेचे वर्णन करण्यासाठी प्रत्येक समाजाला सहाजिकच एका शब्दाची गरज जाणवली असावी त्यातूनच विधवा या शब्दाची उत्पत्ती झाली असावी. संस्कृतमध्ये विधवा लॅटिनमध्ये विडाआ, स्लावमध्ये विडोवा, गौथिक मध्ये विडुवो, या प्रकारची मूळ उत्पत्ती एकच असलेले शब्द सर्व इंडो युरोपियन भाषांमध्ये असल्याचे दिसतात. काळानुसार महिला विषयक दृष्टिकोन बदलत गेला शास्त्रकारांच्या व अन्य समाजाच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनही बदलत गेला. कट्टी व नागेश यांच्या मते "एखादी महिला विधवा झाली की तिच्या कुटुंबात व समाजातही तिची प्रतिष्ठा कमी होते. कुटुंबात तिच्या मताला किंवा निर्णयाला किंमत दिली जात नाही आणि हळूहळू तिचे महत्व कमी होऊ लागते. विवाहितेला जे अधिकार दिले जातात ते विधवाकडून हिरावले जातात परिणामी कुटुंबातील व समाजातील कोणत्या धार्मिक कार्यात सहभागी होता येत नाही. पवित्र शुभ कार्य धार्मिक सण समारंभ साजरे करण्यापासून वंचित राहते. यातूनच विधवा सर्व क्षेत्रात दूर होऊ लागते आणि तिची प्रतिष्ठा कमी होते."

<u>प्रकरण: 2</u> संशोधन आराखडा.

2.1 समस्या सूत्रण. -

भारतामध्ये विधवा महिला हा समाजाचा जास्त प्रमाणात दुर्लक्षित भाग आहे भारत देशाला विकसित राष्ट्र बनायचे असेल तर याकडे दुर्लक्ष देऊन चालणार नाही त्यामुळे या संशोधन विषयाची गरज संशोधकाला वाटली.

2.2 संशोधनाची उद्‌दिष्टे. -

1. मराठा जातीतील विधवा महिलांच्या वैयक्तिक पार्श्वभूमी समस्यांचा आढावा घेणे.
2. मराठा जातीतील विधवा महिलांच्या कौटुंबिक समस्यांचा अध्ययन करणे.
3. मराठा जातीतील विधवा महिलांच्या सामाजिक समस्यांचा अध्ययन करणे.
4. मराठा जातीतील विधवा महिलांच्या आर्थिक समस्या समजून घेणे.
5. मराठा जातीतील विधवा महिलांच्या शैक्षणिक समस्यां समजून घेणे.
6. मराठा जातीतील विधवा महिलांच्या आरोग्य विषयी स्थितीचा तपास करणे
7. मराठा जातीतील विधवा महिलांच्या सामाजिक दर्जा विधवा झाल्यानंतर कसा बदलतो याचा आढावा घेणे.

2.3 संशोधनाची गृहीतके. -

1. मराठा जातीतील विधवा महिलांना वैयक्तिक समस्या अतिशय जास्त आहेत
2. मराठा जातीतील विधवा महिलांना कौटुंबिक आधार फार कमी मिळतो.
3. मराठा जातीतील विधवा महिलांना समाजात कनिष्ठ स्थान आहे.
4. मराठा जातीतील विधवा महिलांचे आर्थिक स्थिती खूप खालावलेली आहे.
5. मराठा जातीतील विधवा महिलांच्या आरोग्यविषयक समस्या खूप जास्त प्रमाणात आहेत.
6. मराठा जातीतील विधवा महिलां शैक्षणिक स्थिती सुधारणा होणे कठीण कार्य आहे.
7. मराठा जातीतील विधवा महिलांचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाच्या योजनांचा अभाव आहे.
8. मराठा जातीतील विधवा महिलांचा पुनर्विवाह बद्‌दल समाजाची विरोधी मत आहे.

2.4 संशोधनाची व्याप्ती व मर्यादा. -

प्रस्तुत संशोधन अहवाल परभणी जिल्ह्यातील मराठा जातीतील विधवा महिलां पुरताच मर्यादित आहे. संशोधन क्षेत्र हे मर्यादित व नमुनांचा आकार क्रियात्मक 200 असा मर्यादित असेल.

2.5 संशोधन साहित्याचा आढावा. -

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाशी संबंधित पूर्व साहित्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कारण विधवा महिलांच्या समस्या काय आहेत याचा शोध घेण्यासाठी प्रथम या संबंधित भूतकालीन संशोधनाचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. त्यावेळेसच पूर्वीच्या

तुलनेत आज समस्या काय आहेत. पूर्व संशोधनात काय मर्यादा होत्या वर्तमान काळात कशाप्रकारे बदल करायला हवेत हे आपणास लक्षात येते. यातूनच संशोधन साहित्याचा आढावा या प्रकरणाचे महत्त्व समजते. विधवा महिलांच्या समस्या जाणून घेण्यासाठी या संशोधनापूर्वी जे काही संशोधन झाले किंवा ग्रंथ संपादित झाल्या करण्यात आले. या सर्व महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख या प्रकरणात करण्यात येणार आहे. अभ्यासकांच्या विधवांबाबत संशोधन करण्याचा उद्देश त्यासाठी वापरण्यात आलेली संशोधन पद्धती त्यातून निघालेले संघर्ष इत्यादींची या प्रकरणात मांडणी करण्यात येणार आहे. त्याचबरोबर एका विषयावर वेगवेगळ्या अभ्यासकांनी आपले विचार मते मांडली असतात. त्यात बराच वेळा विरोधाभास निर्माण होतो मतभेद ही होतात त्यावेळी ते स्पष्ट करणे महत्त्वाचे ठरते तसेच पूर्व संशोधनाच्या या मर्यादा लक्षात घेऊन नवीन तथ्यांची मांडणी करणे गरजेचे ठरते जेणेकरून जातीतील दुर्लक्षित घटकांच्या वर्तमान काळातील समस्या समोर येतील त्या दूर करण्यासाठी उपाय योजना सुचविण्यास सुलभता होईल तसेच या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास मदत होईल या सर्व बाबी काळजीपूर्वक लक्षात घेऊन प्रस्तुत प्रकरणात काही लघुशोध प्रबंध महत्त्वाचे प्रबंध आणि विषयासंबंधीत ग्रंथ इत्यादींचा क्रमवार पद्धतीने आढावा घेण्यात येणार आहे. छाया कोरे व हिरीला लोवेस्टिंग यांनी त्यांच्या Late-Life Widowhood and Meaning in Life अभ्यासात विधवांच्या प्रश्नांबाबत चर्चा करताना वैधव्यदशेबाबत असे मत व्यक्त केले की " वैधव्य दशा ही एक वैयक्तिक घटनाच नसून ती कौटुंबिक घटना होय. महत्त्वाच्या व्यक्तीच्या निधनाने कुटुंबाच्या आर्थिक, सामाजिक नुकसान होते. वैधव्य दशेने महिलांच्या आधीच्या जीवनाचे चित्र पुसले जाऊन तिला सर्व गोष्टी नव्याने उभाराव्या लागतात. एकंदरीत वैधव्य दशा विधवांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या आयुष्यात देखील समस्या निर्माण करते हे यातून लक्षात येण्यास मदत होते."

बाबा पद्मनजी यांनी यमुनापर्यटन या कादंबरीमध्ये विधवांच्या वाट्याला येणाऱ्या दुःखाचा आढावा यात घेतलेला दिसून येतो. काही प्रकरणांच्या माध्यमातून आपल्यासमोर मांडलेली ही कादंबरी दाम्पत्यांच्या सांसारिक प्रवासातून, वेगवेगळ्या प्रसंगांच्या माध्यमातून आपल्यासमोर त्याकाळच्या विधवा स्त्रियांच्या जीवनप्रवासाचे चित्रण बाबा पद्मनजी यांनी केलेले आहे. सतीची चाल, बालविवाह, केशवपन यांसारख्या अनिष्ट रूढी परंपरांना स्त्रियांना कायम सामोरे जावे लागले. पतीच्या अकाली निधनानंतर खेळण्याच्या वयात स्त्रियांना आलेले वैधव्य आणि त्यात वैधव्यानंतर स्त्रियांची होणारी अवहेलना यांचे चित्रण या कादंबरीत लेखकाने केलेले आहे.

2.6 तथ्य संकलन पद्धती. -

प्रस्तुत संशोधन विषयांमध्ये मराठा जातीतील विधवा महिलांच्या समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. एखाद्या विषयावर संशोधन करताना एक निश्चित अशा प्रकारची योजना आखणे आवश्यक असते त्यातून संशोधनाचे अचूक मार्ग प्राप्त होतो संशोधन विषयाचा निवडीपासून ते अंतिम टप्प्यापर्यंत हे संशोधन कार्य विविध प्रक्रिया मधून किंवा स्तरांमधून मार्गक्रमण करत जात असते. त्यासाठी एका वस्तुनिष्ठ अशा संशोधन पद्धतीचा उपयोग करणे अत्यावश्यक ठरते विधवा महिलांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी संशोधिकेने ज्या संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. त्याची सविस्तर मांडणी प्रस्तुत प्रकरणात नमूद करण्यात येणार आहे. प्राथमिक तथ्य संकलन स्त्रोता मधील मुलाखत व अनुसूची या साधनाद्वारे तथ्य संकलन केले जाईल.

2.7 नमुना निवड. -

परभणी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून समान संख्येत 200 विधवा महिला निवडल्या जातील.

प्रकरण योजना:

प्रस्तुत संशोधनासाठी तथ्यसंकलन व तथ्यविश्लेषण प्रक्रिया पार पाडल्यानंतर संशोधन अहवाल प्रबंध स्वरुपात सादर केला जाईल. त्याची प्रकरण योजना पुढील प्रमाणे आहे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

1.1 जातीची पार्श्वभूमी

1.2 मराठा जातीची पार्श्वभूमी

1.3 विधवात्वाचा इतिहास

1.4 विधवा अर्थ व स्वरूप

प्रकरण दुसरे - संशोधन आराखडा

2.1 समस्या सूत्रण

2.2 संशोधनाची उद्दिष्टे

2.3 संशोधनाची गृहीतके

2.4 संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

2.5 संशोधन साहित्याचा आढावा

2.6 तथ्य संकलन पद्धती

2.7 नमुना निवड

<u>प्रकरण: 3</u> मराठा जातीतील विधवा महिलांची वैयक्तिक व कौटुंबिक पार्श्वभूमी.

संशोधन विषय मराठा जातीतील विधवा महिलांच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास हा असून या संशोधनाद्वारे संबंधित प्रकरणात विधवांना भेडसावणाऱ्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यात येणार आहे. प्रस्तुत प्रकरण हे दोन भागात विभागलेले आहेत प्रथम भागात विधवा महिलांची वैयक्तिक पार्श्वभूमी लक्षात घेतली असून दुसऱ्या भागात कौटुंबिक व समस्यांचा अभ्यास सविस्तर अशा पद्धतीने करण्यात येणार आहे. यानंतर मिळालेल्या तथ्यांचे आकृती व तक्त्यांच्या स्वरूपात मांडणी करून वैयक्तिक व कौटुंबिक माहितीचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

<u>प्रकरण: 4</u> मराठा जातीतील विधवा महिलांच्या आर्थिक, शैक्षणिक जीवन.

वरील प्रकरणात विधवांना तोंड द्याव्या लागणाऱ्या समस्यांचा शोध घेण्यात येणार आहे. विधवा महिलांच्या आर्थिक, शैक्षणिक जीवन बाबींच्या समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

<u>प्रकरण: 5</u> मराठा जातीतील विधवा महिलांचा सामाजिक दर्जा.

वरील प्रकरणात विधवा शब्दातूनच आपल्याला त्यांची स्थिती लक्षात येते मराठा जातीमध्ये महिलांना दुय्यम स्थान देण्यात आलेले आहेत. त्यामध्येही विधवा स्त्रियांचा सामाजिक दर्जा हा दुय्यम आहे. त्यांना समाजामध्ये वावरत असताना हीन दर्जाची वागणूक दिली जाते. महिलांचे सण धार्मिक विधी यामध्ये त्यांना सहभागी करून घेतले जात नाही. अशा प्रकारे मराठा जातीतील विधवा महिलांचा सामाजिक दर्जा दुय्यम कनिष्ठ आहे त्यांना पण समान हक्क कायद्यानुसार आदराचे सन्मानाचे जीवन जगण्याचा हक्क आहे. विधवा महिलांचा सामाजिक दर्जा बाबींच्या समस्यांचा शोध घेण्यात येणार आहे.

<u>प्रकरण: 6</u> मराठा जातीतील विधवा महिलांचे आरोग्यविषयक जीवन.

वरील प्रकरणात विधवांना तोंड द्याव्या लागणाऱ्या समस्यांचा शोध घेण्यात येणार आहे. मराठा जातीतील विधवा महिलांचे आरोग्यविषयक जीवन बाबींच्या समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

<u>प्रकरण: 7</u> निष्कर्ष आणि शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात निष्कर्षाची मांडणी करुन उपाययोजना सूचविण्यात येतील. वरील प्रारुप आराखडा व हा स्थुल स्वरुपाचा असून संशोधनाची प्रक्रिया राबवित असतांना त्यात आवश्यक ते बदल केले जातील.

संदर्भ ग्रंथ सूची

- छाया कोरे व हिरीला लोवेस्टिंग Late life widowhood and meaning in life.
- बाबा पद्मनजी, कादंबरीयमुनापर्यटन: हिंदुस्थानातील विधवांच्या स्थितीचे निरूपण.
- Padmanji, Baba. (1855). Kutumbachi Sudharana.
- कट्टी व नागेश विधवांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास अर्थशास्त्रीय संशोधन अहवाल.
- Sharma, Preeti. (1990). Hindu Women's Right to Maintenance. New Delhi: Deep & Deep Publication.
- महिला बाल विकास विभाग महिलांचे हक्क व अधिकार मुंबई महाराष्ट्र शासन
- साळुंखे सप्टेंबर 2018 हिंदू संस्कृती आणि स्त्री मुंबई लोक वांग्मय.
- मालसे, स.गं., आपटे, नंदा विधवा विवाह चळवळ (१८००-१९००) मुंबई, १९७८.

- The Hindu Widow in Indian Literature Rajul Sogani by: Rochona Majumdar.
- Social Pariahs and Domestic Drudges: Widowhood among Nineteenth Century Poona Brahmins and Uma Chakravarti.

संशोधक

सुचिता सुभाषराव ढोणे
एम.ए., बी.एड्., सेट (समाजशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. फिसफिसे टि.आर.
समाजशास्त्र पदवी व पदव्युत्तर विभाग प्रमुख
श्री, शिवाजी महाविद्यालय, परभणी.